जा.क्र.वि.शा./राजकीय /९८९७/२०१७
पोलीस उप आयुक्त विशेष शाखा,कार्यालय पुणे
दिनांक :- २३/११/२०१७

**<u>विषय</u> :- महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३६ प्रमाणे आदेश.**

**<u>आदेश</u>**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पत्र क्र. रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.२१/का-८ दि.१७/११/२०१७ च्या आदेशान्वये माहे जानेवारी-फेब्रुवारी-२०१८ या कालावधीत मुदती संपणा-या पुणे जिल्हयातील ९९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहीता दिनांक १७/११/२०१७ रोजी रात्रौ १२.०० वा. पासून ते निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील उत्तमनगर पोलीस स्टेशन मधील कुरण बुद्रूक ता. वेल्हे जि. पुणे या ग्रामपंचायतीची निवडणूक होणार असून, दिनांक २६/१२/२०१७ रोजी मतदान व दिनांक २७/१२/२०१७ रोजी मतमोजणी होणार आहे.

आणि ज्याअर्थी, सदरची सार्वत्रिक निवडणूक ही सुरळीतपणे व शांततेत पार पाडण्यासाठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था राखणे आवश्यक आहे

त्याअर्थी मी रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३६ प्रमाणे मिळालेल्या अधिकारानुसार उत्तमनगर पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकारी यांना खालील नमूद केलेप्रमाणे लेखी अगर तोंडी आदेश देण्याचे अधिकार प्रदान करीत आहे.

**अ**. रस्त्यावरून जाणा-या जमावाचे अगर मिरवणूकीत व्यक्तीचे वागणे अगर कृत्याबाबत आदेश देणे.

**ब**. ज्या मार्गाने मिरवणूक किंवा जमाव जाईल अगर जाणार नाही ती वेळ व मार्ग निश्चित करणे.

**क**. सार्वजनिक ठिकाणी अगर सार्वजनिक करमणूकीच्या कार्यक्रमाच्या वेळी वापरण्यात येणा-या लाऊड स्पिकरच्या ध्वनीची तिव्रता निश्चित करून दिलेली वेळ यावर नियंत्रण करणे.

**ड**. मिरवणूकीचे प्रचाराच्या निमित्ताने जाहीर सभा घेण्याचे ठिकाण दिनांक व वेळ याबाबत नियंत्रण करणे.

हा आदेश पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील उत्तमनगर या पोलीस स्टेशनचे हद्दीत दि.२३/११/२०१७ चे रात्रौ ००.०१ वा.पासून ते दिनांक २७/१२/२०१७ चे २४.०० वा.पर्यंत लागू राहील.

सदर आदेशचा भंग करणारी व्यक्ती महाराष्ट्र पोलीस ॲक्ट १९५१ च्या कलम १३४ नुसार शिक्षेस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक २३/११/२०१७ रोजी दिला आहे.

**(रविंद्र कदम)**
**पोलीस सह आयुक्त,**
**पुणे शहर.**

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :- २३/११/२०१७**